Research Papers

# डॉ. आंबेडकरांचे संसदीय लोकशाही संदर्भातील विचार

*प्रा. अनिल काळबांडे*
मराठी विभाग प्रमुख
मिलींद महाविद्यालय, मुळावा
ता. उमरखेड जि. यवतमाळ

## प्रास्तविक

भारताच्या राज्यघटनेच्या निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान फार महत्वपूर्ण आहे.
भारतीय राज्यघटनेने संसदीय शासन पध्दतीचा स्विकार केलेला आहे. ही शासनपध्दती भारतासाठी काही नवीन नाही, कारण बुध्दभिक्षु संघाचा ज्यांनी अभ्यास केलेला आहे त्यांना हेच दिसून येईल की, संघ म्हणजे मुर्तिमंत लोकसभा होत्या. आजच्या लोकसभेत ज्या नियमबध्द बाबी पाळल्या जातात त्या सर्व बुध्द भिक्षुसंघाच्या बैठकीत पाळण्यात येत होत्या. 1

भारतीय राज्यघटनेने इंग्लडकडून संसदीय शासनपध्दती स्विकारलेली आहे. परंतु भारतासारख्या देशात ज्या देशात धर्म, जात, भाशा, संस्कृती, लिंगभेद यासारखी सामाजिक विशमता आहे, राजकीय प्रक्रियेप्रती जागरुक लोकमत नाही, अशा देशात संसदीय लोकशाही यशस्वी होण्याकरिता आवश्यक गोश्टींच्या बाबत डॉ. आंबेडकरांचे विचार समकालीन परिस्थितीत देखिल उपयुक्त स्वरूपाचे आहेत.

22 डिसेंबर 1952 – पुणे, विधी ग्रंथालय, सभागृहासमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे भाशण केले त्यामध्ये ते म्हणतात की, संसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी प्रथम अट म्हणजे समाजात स्पश्टपणे जाणवणारी विशमता विद्यमान नसणे होय. समाजात एका वर्गाला सर्व अधिकार आणि सुविधा प्राप्त आहेत आणि दुस–या वर्गाला मात्र फक्त ओझेच वाहावे लागत आहे. दासतेचे जीवन जगावे लागत आहे अशी अवस्था असू नये 2.

विशमता, अशी अन्यायकारक विभागणी व त्यावर आधारलेली समाजरचना यामध्ये हिंसात्मक क्रांतीची बीजे असतात. लोकशाहीमध्ये पीडित, दलित, ज्याचे हक्क छिनून घेतलेले असतात असे जे भारवाहक बनलेले असतात ते लोक आणि ज्यांनी सर्व हक्कांच्या समुच्चय स्वतःपाशी केलेला असतो असे लोक या दोघांनाही मतदानाचा समान हक्क प्राप्त होतो. सर्व हक्क व सत्तेचे केंद्रीकरण ज्यांच्या ठायी झाले आहे असा वर्ग बहुदा पीडित वर्गापेक्षा कमी असतो. आणि निर्णय घेण्याच्या कामी आपण बहुमताचे तत्व मान्य करीत असल्याने जर या सत्ताधारी वर्गाने स्वेच्छेने आपले विशेश अधिकार सोडले नाही. तर मग त्यांच्या व खालच्या वर्गामधील अंतर वाढेल. लोकशाहीचा अंत होईल म्हणून आंबेडकर म्हणतात की जगातील निरनिराळया भागातील लोकशाहीच्या इतिहासाचा अभ्यास केल्यास, लोकशाहीच्या अपयशाचे कारण सामाजिक विशमता, वर्गावर्गात उभी असलेली असमानतेची दरी हेच आहे 3.

समाजात विशिश्ट वर्गाची सातत्याने पिळवणूक व दडपणूक होत असेल तर संसदीय लोकशाही टिकणार नाही. शासनामध्ये सर्वांचा सहभाग असणे आवश्यक आहे. समानता, स्वातंत्र्य, न्याय सर्वांनाच प्राप्त व्हावा असे आंबेडकर म्हणतात 4. डॉ. आंबेडकरांनी घटना परिशदेमध्ये केलेल्या भाशणात स्पश्ट केले होते की, भारतातील सामाजिक विशमता नश्ट झाली नाही तर राजकीय लोकशाही लवकरच नश्ट होईल 5.

25 नोव्हेंबर 1951 मुंबई शिवाजी पार्क येथे व 20 एप्रिल 1954 नागपूर, स्वागत समारंभात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या भाशणामध्ये ते म्हणतात की, संसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेकरीता प्रभावी विरोधी पक्षाची आवश्यकता असते. कारण संसदीय लोकशाहीत दर पाच वर्शांनी निवडणुका होतात व या निवडकांमध्ये जनतेला आपले प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार मिळतो. त्यामुळे विरोधी पक्षाने सत्ताधारी पक्षाच्या लगाम सत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी सतत जागरूक राहून शासनाला चुकीच्या मार्गावरून परावृत्त करण्याचे काम केले पाहिजे. अज्ञानाचे प्राबल्य

Indian Streams Reserach Journal
Vol.1,Issue.X/Nov; 2011

असलेल्या भारतासारख्या देशात विरोधी पक्षाने हे महत्वपूर्ण काम केले पाहीजे. लोकशाहीमध्ये राज्यसत्तेवर लोकमताचे नियंत्रण नुसतेच हवे असे नाही तर ते तात्काळ व सतत असावयास हवे. लोकसभेमध्ये सरकारला तेथल्या तेथे अडविणारे व आव्हान देणारे लोक असावे लागतात. यावरून विरोधी पक्षाची भुमिका किती महत्वपूर्ण आहे. हे स्पश्ट करण्याचा प्रयत्न आंबेडकर करतात. विरोधी पक्षाच्या अस्तित्वामुळे सत्तारूढ सरकारचे ध्येय धोरण तापवून ऐरणीवर ठोकून नीटनेटके करण्याची व्यवस्था असते. सत्तारूढ पक्षाला आपल्या धोरणाचे व राज्यकारभाराचे समर्थन आणि त्या पक्षात नसलेल्या लोकांच्या शंकाचे निरसन सततपणे करावे लागते.त्यामुळे विरोधी पक्षाची लोकशाहीत आवश्यकता आहे. इंग्लंड व कॅनडासारख्या देशांमध्ये विरोधी पक्षाच्या नेत्याला शासनाकडुन प्रधानमंन्र्या प्रमाणे वेतन मिळते. त्यामुळे लोकशाहीत शासनाचे काय चुकते हे निदर्शनास आणून देणारी यंत्रणा असणे आवश्यक आहे हे काम विरोधी पक्षाद्वारा होत असते. संसदीय शासनपध्दतीचे महत्व सांगतांना आंबेडकर म्हणतात की यात निरनिराळया समस्यांबदल आपली मते स्पश्टपणे व्यक्त केली जाऊ शकतात, विवाद्य मुद्यासंबंधीचे निर्णय मनमोकळया चर्चेअंती आणि सर्वांच्या संमतीने घेण्याची तरतुद संसदीय पध्दतीच असते. तसेच शासनावर टीका करून शासनाला योग्य त्या मार्गावर आणण्याचा प्रयत्न या शासन पध्दतीत करता येतो 7.

10 जून 1950 त्रिवेंद्रम, लेजिस्लेटिव्ह चेंबरमध्ये घटना व घटनात्मक नीती यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जे भाशण झाले त्यामध्ये ते म्हणतात की, अल्पसंख्यांबदल सरकारने आदर बाळगला पाहिजे. अल्पसंख्याकांना आपली मते मांडण्याची संधी याच पायावर पार्लमेंटरी लोकशाहीची उभारणी झाालेली आहे. लोकशाहीच्या नावाखाली अल्पसंख्याकांची गळचेपी बहुसंख्याकांनाद्वारा होता कामा नये. अल्पसंख्याकांना सुरक्षितता वाटली पाहिजे. बहुसंख्याक मंडळी कारभार करीत असली तरी आपल्याला इजा पोहोचणार नाही, आपल्यावर अन्याय होणार नाही याची हमी अल्पसंख्याकांना मिळाली पाहीजे. छोटया अल्पसंख्य जमातीच्या सदस्यांनी सभागृहात मांडलेल्या सूचना याचा सरकारी पक्षाकडून सतत विरोध झाल्यास अल्पसंख्याक लोकांना आपल्या दुःखांना वाचा फोडायला संधी मिळणार नाही. म्हणूनच लोकशाहीत बहुमतवाल्यांकडुन दडपशाहीचे वर्तन कदापि होता कामा नये 8.

संसदीय लोकशाहीच्या यशस्वतीतेसाठी आवश्यक असलेली बाब म्हणजे विवेकी लोकमत होय असे आंबेडकर म्हणतात. समाजातील काही लोकांना अन्यायाची अगदीच थोडी झळ बसते, तर काहींना अनन्वित छळ सोसावा लागतो, ते अन्यायाच्या ओझ्याखाली दडपून गेलेले असतात. आपल्या भारतात प्रत्येक खेडयात विभक्त वस्तीत ठेवलेल्या अस्पृश्य जातींचा पश्न हाताळण्यासाठी व त्यांच्यावरील अन्यायाचा मुकाबला करण्यासाठी फार कमी लोक समोर येतात याचे कारण सामाजिक विवेक बुध्दीचा अभाव हा आहे. अल्पसंख्याकांवर होणाऱ्या अन्यायांचा मुकाबला करण्यासाठी जर इतर लोक पुढे आले नाहीत तर मग पुन्हा क्रांतीचे वारे अल्पसंख्याकांच्या डोक्यात खेळू लागते. संसदीय शासनात लोकराज्य चालविण्यासाठी लोकांनी सतत जागे असावे, अन्याय झाल्यास जनतेने तातडीने प्रतिकार करावा. लोकांचा विवेक जागृत असल्यास दडपशाही व पिळवणूक थांबते. आणि लोकशाहीत अपेक्षित असलेल्या सामाजिक स्थैर्य आणि व्यक्तीविकास हया दोन्ही गोश्टी साध्य होऊ शकतात 9.

संसदीय लोकशाही हे लोकांचे राज्य असते पण प्रत्यक्ष व्यवहारात लोक शासन चालविण्याबाबत उदासिन असतात. त्यामुळे ठराविक हितसंबंधी, संधीसाधू लोक , सत्ता प्राप्तीसाठी सातत्याने प्रयत्न करतात. आणि उर्वरीत लोक केवळ शासन निवडून दिले म्हणजे आपली जबाबदारी संपली असे मानतात. त्यामुळे व्यावहारीक पातळीवर समाजात शासन आणि शासीत यांच्यात स्पश्ट सीमारेशा निर्माण होते. जनतेची ही मानसिकता कायम राहिल्यास संसदीय पध्दतीचा आत्माच हरवेल व व्यवहारात लोकशाही हा सर्व लोकांचा राज्यकारभार न बनता केवळ काही मोजक्या लोकांचा राज्यकारभार बनतो असे बाबासाहेब आंबेडकर म्हणतात 10.

संसदीय लोकशाही संदर्भात विचार मांडतांना बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की राज्यव्यवस्थेसाठी नीतीमान समाज व्यवस्थेची आवश्यकता आहे. नीतीशास्त्र हे राज्यशास्त्राहून वेगळे आहे असे समजले जाते, त्यांचा अन्येन्य काहीच संबंध नाही असे समजले जाते. नीतिमत्तेशिवाय राजकारण करता येते हा एक गैरसमज आहे. कारण लोकशाहीत घडते तरी काय?लोकशाही म्हणजे स्वतंत्र सरकार असे संबोधण्यात येते. स्वतंत्र सरकार म्हणजे ती राज्यपध्दती की, जिच्यामध्ये जास्तीत जास्त सामाजिक क्षेत्रात लोकांना कायद्याच्या हस्तेक्षेपाशिवाय मोकळेपणाने जीवन जगता येते आणि जर कायदा करण्याची आवश्यकता वाटलीच, तर तसला कायदा पाळला जाण्याइतपत सामाजिक नीती समाजामध्ये निर्माण झाालीअसल्याची खात्री कायदे करणाऱ्यांना मिळाली पाहिजे. सामाजिक नीतीच्या अभावी लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही.

लोकशाहीच्या यशासाठी महत्वपूर्ण बाब म्हणजे वैधानिक व कारभार विशयक क्षेत्रांत पाठवावयाची क्षमता ही होय. राज्यकारभार करीत असतांना वशिलेबाजीचा वापर केला जात असेल तर राज्यकारभार हा अन्यायकारक व गोंधळाचा होईल. एखा़द्या पक्षाचे शासन, आपल्या पक्षाच्या लोकांच्या हितासाठीच प्रशासकीय व्यवस्था राबवित असेल तर तेथे समता राहणार नाही. इंग्लंडसारख्या देशात राज्यकारभार निश्कलंक,निःपक्षपाती व राजकारणापासून अलिप्त राहावा म्हणून राजकीय प्रशासन आणि नागरी प्रशासन असा भेद केला आहे परंतु भारतात राज्यकारभारा विशयक कामात सरकारने हस्तक्षेप करू नये, सरकारचे काम हे धोरण ठरविण्याचे आहे, हस्तक्षेप किंवा पक्षपात करण्याचे नाही, ही बाब मुलभुत स्वरूपाची असून, तिच्यापासून आपण आज दूर जात आहोत. तिचा त्याग करीत आहोत, असे बाबासाहेब म्हणतात, लोकशाहीचे यश हस्तगत करण्यासाठी संविधानात्मक नीतीचे पालन करणे आवश्यक आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. संविधानात बदलत्या परिस्थितीनुसार बदल करणे आवश्यक असते या विचाराशी ते सहमत होते म्हणूनच घटनेच्या 368 व्या अनुच्छेदाप्रमाणे घटनादुरूस्तीचे अधिकार संसदेला दिलेले आहेत 11. सातत्याने आदर करावा. शासनाने राज्यघटनेच्या उदिश्टाप्रमाणे कार्य केल्यास संसदीय पध्दती मजबुत पायावर उभी होते. ज्या संविधानीक नीतीमताच पाळली जात नाही, तेथे लोकशाहीचे नुकसान होईल असे आंबेडकर म्हणतात 12.

डॉ. आंबेडकरांच्या मते संसदीय शासन पध्दती ही विशेश महत्वपूर्ण आहे. कारण या शासनपध्दतीत मुक्त वातावरणात होणाऱ्या निवडणुकीच्या माध्यमातुन राज्यकर्ते निवडले जात असल्यामुळे एका पक्षाकडून दुसऱ्या पक्षाकडे सत्ता बदलण्याची संधी नागरिकांना मिळते. सन्मानित विरोधी पक्ष व स्वतंत्र वृत्तपत्रे आणि मुक्त न्याय निवडणुका हे वैशिश्ट आंबेडकराना महत्वाचे वाटते.

संसदीय पध्दतीत एकाच व्यक्तीकडून अगर गटाकडून कायदे मंडळाचे, कार्यकारिणीचे आणि न्यायमंडळाचे कार्य केले जात नाही. सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे नागरिकांवर अन्याय होण्याची शक्यता किमान पातळीवर येते. शासन आणि समाजाला हुकुमशाहीपासून सुरक्षित ठेवण्याचे कार्य त्यातून पार पडते. तसेच निर्वाचित होणाऱ्या संसद सदस्यांना, मंन्र्यांना लोकांच्या विश्वासास पात्र ठरावे लागते.

भारतासारख्या देशात संसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेच्या मार्गातील अडथळयांच्या संदर्भात आंबेडकर म्हणतात की, भारतातील शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे. निरक्षरता हा या

Indian Streams Reserach Journal
Vol.1,Issue.X/Nov; 2011

समाजाला लागलेला शाप आहे. संसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेकरीता राज्यकारभाराचे आवश्यक ज्ञान आणि शिक्षण आवश्यक आहे. भारतात मात्र अज्ञानामुळे बहुसंख्यांका मध्ये राजकीय, सामाजिक आणि आर्थिक प्रश्नांबाबत कमालीचे अज्ञान आढळते असे अज्ञानी संसदीय लोकशाहीचे राज्यसरकार चालविण्यात अपुरे सिध्द होतात.

भारतात रूढी, अंधश्रध्दा आधारित परंपरागत समाज आहे. तसेच सामाजिक विशमता व ऐक्य नसलेला समाज आहे. जाती व्यवस्था बळकट आहे. भारतातील जातीयवादी समाजामुळे सरकारमध्येही जातीचे प्रतिबिंब उमटते, तसेच आर्थिक विशमता आहे. काही मोजक्या लोकांच्या हातात आर्थिक सत्ता व समृध्दी केंद्रीत असून बहुतांश लोक दारिद्रयात खितपत पडले आहे. अशा पध्दतीत संसदीय लोकशाहीला अपेक्षित जनतेचा राज्यकारभार प्रस्थापित होऊ शकत नाही.

संसदीय लोकशाहीच्या मार्गातील सर्वात मोठाा अडथळा म्हणजे विभुतीपूजा होय, असे आंबेडकर म्हणतात. डॉ. आंबेडकरांच्या मते राजकीय क्षेत्रातील विभूतीपुजेमुळे लोकशाहीचे अंधःपतन होते आणि हुकुमशाहीचा मार्ग मोकळा होतो. इंग्लंडच्या समाजरचनेत मोठया व्यक्तीच्या चरणी स्वातंन्त्र्य अर्पण करण्याची प्रथा नाही. परंतु भारतीय समाजात मात्र लोकाची विभूतीपुजा आढळते. परिणामी लोकशाहीचे समता हे मूल्य पायदळी तुडविल्या जाते. व्यक्तीपुजेमुळे लोकांची सत्ता त्यांच्या हातात न जाता काही मोजक्यांच्या हातात जाऊन लोकशाहीचे रूपांतर हुकुमशाहीत होणाऱ्या संभव असतो.

डॉ. आंबेडकरांनी घटना परिशदेत समारोपणाच्या भाशणात असे उदगार काढले होते की, लोकशाहीचा अर्थ स्वातंन्त्र्य, समता, बंधुत्व ही तत्व ज्यात अंतर्भूत झालेली आहोत ते जीवन होय. ही तत्वे एकमेकांपासून विलग करता येत नाहीत. परंतु भारतीय समाज विशमतेवर आधारित असल्याने समतेचा लोप होऊन बंधुत्वाच्या भावनेपासून समाज दूर जातो ही संसदीय शासनातील अडथळा होय असे आंबेडकर म्हणतात.

डॉ. आंबेडकरांनी घटना परिशदेत सांगितले की, भारताच्या संदर्भात संसदीय लोकशाहीला दुसरा पर्याय नाही. परंतु आर्थिक व सामाजिक लोकशाहीची उपेक्षा झााल्यास मात्र राजकीय लोकशाहीचा डोलारा फार काळ टिकणार नाही असे मत आंबेडकरानी व्यक्त केले आहे 13.

***डॉ. आंबेडकरांच्या विचारांची समजकालीन परिस्थितील उपयुक्तता :—*** भारतीय राज्यघटनेचा अंमल सुरू होऊन साठ वर्शे होऊन गेलेली आहे. राज्य घटनेनुसार भारतात संसदीय लोकशाहीचा अंमल चालत आला आहे. परंतु राज्यकर्त्या वर्गाने ही संसदीय लोकशाही यशस्वी होण्याच्या दृश्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या विचारांची प्रत्यक्षात अंमलबजावणी केलेली नाही. जोपर्यंत एका बाजुला पीडीत शोशितांचा सत्तावंचित वर्ग आहे. दुसऱ्या बाजुला सर्व सत्तांचे केंद्रीकरण ज्यांच्या हातात आहे असा वर्ग आहे. तोपर्यंत समाजाची विभागणी होत राहणार, पीडित शोशित समाजावर अन्याय होत राहणार, त्यांचे शोशण होत राहणार अशा ठिकाणी लोकशाही मूळ धरू शकणार नाही. हीच परिस्थिती भारतात आजपर्यंत घडत आली आहे. संविधानाच्या मार्गाने सामाजिक लोकशाही प्रस्थापित होईल आणि त्याच मार्गाने समाजातील वंचितता दूर होईल असा डॉ. आंबेडकरांना विश्वास वाटत होता. परंतु गेल्या सहा दशकांत राज्यकर्त्यांनी त्या दिशेने पावले टाकली नाहीत 14.

जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून बलशाही भारताकडे मोठया अभिमानाने पाहिले जाते. सन 2020 मध्ये भारत महासत्ता होणार असे दिवास्वप्न आपण पाहत आहोत. देश चालविण्याचे पवित्र विहार म्हणून ज्या संसदेचा गौरव केल्या जातो त्या संसदेच्या आजपर्यंतच्या कामकाजाचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की, 1952—1979 या अवधित वार्शिक अंदाजपत्रकांवरच्या चर्चेला लोकसभा तिच्या वेळेपैकी 23 टक्के वेळ दयायची ती आता फक्त 10 टक्के वेळ देते 15. 14 व्या लोकसभेतील पाच वर्शाच्या कामकाजाचा अभ्यास केल्यास असे आढळून येते की, पाच वर्शात केवळ 326 दिवसच कामकाज चालले, 1738 तास 45 मिनिटे कामकाज झाले. त्यापैकी 423 तास गदारोळात गेले 16. लोकसभेच्या इतिहासातील सर्वात दुःखद पर्व म्हणजे नोंव्हेबर ते डिसेंबरच्या 2010 दरम्यान पार पडलेले हिवाळी अधिवेशन होय. विरोधकांच्या गोंधळामुळे व सरकारच्या अट्टाहासापायी संसदेचे हिवाळी अधिवशन कोणत्याही प्रकारची गंभीर व महत्वाची चर्चा न करता संपले. लोकसभेत एका दिवसाचे कामकाज आणि राज्यसभेत एकही दिवस कामकाज चालले नाही17. एकंदर संसदच लोकप्रतिनिधींनी बंद पाडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेला विरोधी पक्ष आज दिसून येत नाही. कारण लोक प्रतिनिधींनी जतनेच्या प्रश्नांची सोडवणूक चर्चेतून करावी असे आंबेडकर म्हणतात. तसेच सत्ताधारी पक्षाच्या चुकीच्या राज्यकारभार पध्दतीवर विरोधकांनी सभागृहात समोरासमोर बसून विधायक दृश्टीने चर्चा करावयास हवी. एकाच मुद्यावरून संपुर्ण अधिवेशनाचा कालावधी वाया घालणे हे देशाचे दुदैव, देशासमोर लोकसंख्या विस्फोटामुळे साधन सुविधावर पडणारा ताण, रूपयांचे अवमूल्यन, दारिद्रय, बेरोजगारी, पायाभूत सुविधांचा अभाव इत्यादी गंभीर प्रश्न देशासमोर असतांना 2 जी स्पेक्ट्रम वाटप घोटाळयावरून ढप्प झाालेल्या हिवाळी अधिवेशनात संसदीय कामकाजाचा एवढा प्रचंड वेळ जबाबदार लोक प्रतिनिधींनी वाया घालविणे हे बळकट लोकशाहीच्या दृश्टीने धोक्याचे लक्षण आहे.

महाराश्ट्र राज्य विधिमंडळाचे जे हिवाळी अधिवेशन झााले. त्यामध्येही अनेक मुद्ये वादळी ठरले. संविधानाचा अवमान, आदर्श प्रकरणी चौकशीसाठी नेमण्यात आलेली न्यायालयीन समिती, पोतराजाची वेशभुशा, काही प्रतिनिधींचे निलंबन, प्रतिनिधीची भरघोस तिप्पट पगारवाढ या अनेक बाबींमध्ये हे अधिवशन संपले. डॉ. आंबेडकरांना असा संसदीय कामकाजातील गोंधळ अपेक्षित नव्हता. आजचे राजकारण स्वच्छ, सुसंस्कृत पारदर्शक राहिलेले नाही. संसद किंवा राज्यविधिमंडळातील सदस्यांना जोपर्यंत ही जाणीव होणार नाही की लोकप्रतिनिधी या नात्याने त्यांनी सभागृहात जनतेचे प्रश्न मांडले पाहिजेत. परस्पर हितसंबंध आणि स्वार्थासाठी सभागृहात मांडायचे नसते तोपर्यंत प्रभावी विरोधी पक्ष निर्माण होऊ शकणार नाही18.

आजचे भारतापेक्षा समाजव्यवस्थेचे स्वरूप पाहिल्यास निरक्षरतेचे प्रमाण खुप मोठे आहे. 2001 च्या जनगणनेनुसार साक्षरतेचे प्रमाण 654 टक्के आहे. त्यामध्ये पुरूप साक्षरता 75.85 टक्के आणि स्त्री साक्षरता 54.16 टक्के आहे. एकंदर संसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी राज्यकारभाराचे आवश्यक ज्ञान व शिक्षण आवश्यक आहे असे आंबेडकर म्हणतात तसेच लोकांची राजकीय प्रक्रियेप्रती उदासीन प्रवृत्ती आहे. संसदीय लोकशाहीत प्रौढ मतदारास मतदानाच्या माध्यमातुन आपला प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार असतो परंतु भारतात आजपर्यंत झाालेल्या लोकसभेच्या निवडणुकांच्या मतदानाच्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, 1952 ते 2009 पर्यंतच्या सार्वत्रिक निवडणुकीत 1984 मध्ये 63.56 म्हणजे सर्वाधिक मतदान झााले आणि 1971 मध्ये सर्वात कमी 55.29 टक्के मतदान झााले. म्हणजे जनता मतदान प्रक्रियेप्रती उदासीन आहे 19.

डॉ. आंबेडकर म्हणतात की, संविधानात्मक नीतीतत्वाचे पालन व्हायला पाहिजे पण भारतात अलीकडच्या दोन—तीन दशकांत मात्र वेगवेगळया कारणाने असंसदीय वातावरण तयार होत आहे.

1. मार्च 1999 मध्ये तामिळनाडू विधानसभेत अण्णा द्रमुकचे सदस्य आर. तमरेक्कनी यांनी कृशिमंत्री व्ही. एस. अरमुगम यांच्या

नाकावर ठोसा लगावला.

2. 1993 :– उत्तरप्रदेश विधानसभेत झालेल्या हाणामारीत भाजपचे आमदार केसरीनाय त्रिपाठी यांचे नाक फुटले.

3. 21 डिसेंबर 1999 लोकसभेत समाजवादी पक्षाचे सदस्य देवेंद्रसिंह यादव हे ज्या वेळचे कृशिमंत्री नितीशकुमार यांच्या अंगावर धावून गेले.

4. 25 जुलै 2000 :– महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात अभुर्तपुर्व गोंधळ, खुर्च्या, ध्वनिक्षेपकांची मोडतोड, अध्यक्षांच्या टेबलावर सदस्य उभे राहिले.

5. मार्च 1998 :– बिहार विधानसभेत मंत्र्यांकडून विरोधी आमदाराला झालेली मारहाण.

6. 24 जून 2002 :– पश्चिम बंगाल विधानसभेत तृणमुल कॉग्रेसच्या सदस्यांनी केलेल्या धक्काबुकीत चार सुरक्षा कर्मचारी व मार्शल जखमी झाले.

7. फेब्रुवारी 2009 :– आंध्रप्रदेश विधानसभेत विरोधी पक्षाचे सदस्य आणि मार्शल दरम्यान झाालेल्या हाणामारीत दोन सदस्य जखमी झालेत.

8. लोकसभेतही जेंव्हा लाच दिल्याचा आरोप होऊन नोटा फडकल्या तेव्हा लोकशाही व्यवस्था तेथे पुर्णपणे अपयशी झाली असे म्हणावे लागेल.

संविधानातील नीतीतत्वे जर अशी राज्यकर्त्यांनी पाळली नाहीत तर संसदीय लोकशाही व्यवस्था टिकुन राहणार नाही.तेंव्हा यावर प्रतिबंध घालण्यासाठी बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची आज आवश्यकता आहे20. याकरिता विवेकी व जागरूक लोकमताची आवश्यकता डॉ. आंबेडकर सांगतात.

***सारांष :–***

भारतीय घटनासमितीच्या 14 ऑगस्ट 1947 ला सुरू झाालेल्या दुसऱ्या अधिवेशनापासून ते 26 जानेवारी 1950 पर्यंत घटनासमितीची अंमल बजावणी सुरू होईपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य अतिशय मोलाचे आहे. आपल्या देशात प्रमुख चार धर्म, शेकडो हजारो जाती, त्यांची भाशा, संस्कृती रितीरिवाज, परंपरा यांचे सामाजिक पर्यावरण संमिश्र आहे. अशा संमिश्र समाजासाठी संविधान तयार करण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. भारताच्या घटनेविशयी चर्चा चालू असतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी वेळोवेळी भाशणे केली त्यामधून त्यांचे लोकशाही संदर्भातील विचार त्यांनी मांडले. लोकशाहीबदल डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतीकारक बदल रक्तविरहित मार्गाने घडवून आणणारी शासनपध्दती म्हणजे लोकशाही होय.

संसदीय लोकशाहीबदल त्यांनी वेळोवेळी केलेल्या भाशणां मधुन विचार व्यक्त केलेले आहेत. 22 डिसेंबर 1952, पुणे, विधी ग्रंथालयासमोर केलेल्या भाशणात ते म्हणतात की संसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी सामाजिक समता आवश्यक आहे. समाजातील विशिश्ट वर्गाची सातत्याने पिळवणूक होत असेल तर संसदीय लोकशाही टिकणार नाही. आजची भारताची स्थिती जर अभ्यासली तर असे दिसून येते की, समाजव्यवस्थेत एका बाजुला पीडित वंचित समाज आहे आणि दुसऱ्या बाजुला सत्ताचे केंद्रीकरण झालेला वर्ग आहे, जोपर्यंत समाजाची विभागणी होत राहणार तोपर्यंत समाजावर अन्याय होत राहील. त्यामुळे आंबेडकरांच्या विचाराला अनुसरून समाजात बदल होण्याची आज आवश्यकता आहे. सामाजिक विशमता लोकशाहीला पंगु बनविते म्हणून सामाजिक समता निर्माण होणे आवश्यक आहे. 25 नोंव्हेबर 1951 मुंबई, 20 एप्रिल 1954 नागपुर येथे केलेल्या भाशणांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, सांसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेकरीता प्रभावी विरोंधी पक्षाची आवश्यकता आहे. विरोधी पक्ष हा वैचारिक व जाणकार असावा. परंतु भारतातील विरोधी पक्षाद्वारा आपली कर्तव्य योग्यप्रकारे पार पाडली जात नाहीत अशी परिस्थिती दिसत आहे. विरोधी पक्षाद्वारा सभागृहात समोरासमोर बसून विधायक मुद्यावर चर्चा करणे आवश्यक असते परंतु आज विरोधी पक्ष एकाच मुद्यावर संपुर्ण अधिवशन कामकाज न करता संपविल आहेत. देशासमोर अनेक महत्वपूर्ण प्रश्न असतांना संसदेचा प्रचंड वेळ वाया घालविणे म्हणजे लोकशाहीच्या दृश्टीने धोक्याचे आहे. या स्थितीत बाबासाहेबांच्या विचारांची फार आवश्यकता आहे.

संविधानाचे पालन व्हावे आणि संविधानात्मक नीतीतत्वाचे पालन व्हावे असे आंबेडकर म्हणतात. जेथे संविधानात्मक नीतीतत्वे पाळली जात नाहीत तेथे लोकशाहीचे नुकसान होते. भारतात तर आज संसदीय कामकाजात असंसदीयपणा वाढत चाललेला आहे. संसदीय कामकाजात असंसदीय शब्दांचा वापर होतो. आणि आज प्रसारमाध्यमा द्वारा तो सरळ लोकांना दाखविला जातो. या परिस्थितीत जनतेचा लोक प्रतिनिधींवरील विश्वास कमी होत आहे. हे भारतीय लोकशाही समोरील फार मोठे आव्हान आहे.

विवेकी लोकमत लोकशाहीस आवश्यक आहे असे आंबेडकर म्हणतात. भारतातील निरक्षरता, आर्थिक विशमता, जातीय समाजरचना यामध्ये राजकीय पक्ष पैसा, जात, धर्म या आधारावर मतदार वर्तनाला प्रभावित करतात. या परिस्थितीत न्याय, स्वातंत्र्य, समता प्रस्थापित करून समाजाचे सर्व ऐहिक प्रश्न सुखी, समृध्द आणि प्रगत जीवन भारतात साकरण्यासाठी शासनसंस्थेत रक्तपातविरहित मार्गाने परिवर्तन घडवून आणणे हा लोकशाहीचा बाबासाहेबांनी सांगितलेला मार्ग प्रत्यक्षात आणणे आवश्यक आहे.

***संदर्भ :–***


1. डॉ. आंबेडकर बी.आर. लोकशाहीचे भवितव्य, पुर्णामाय भाग 3 वंदना मोहोड, जुलै 2000, पृ.क्र. 46
2. गायकवाड प्रदीप, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची समग्र भाशणे – खंड 9, क्षितिज पब्लिकेशन्स नागपुर, 2003 पृ.क्र. 42
3. खरात शंकरराव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार, इंद्रायणी प्रकाशन पुणे 2008 पृ.क्र.149
4. दैनिक सकाळ, 6 डिसेंबर 2010, बाबासाहेबांचा इशारा मानला असता तर नामदेव ढसाळ.
5. पुर्वोक्त, संदर्भ कत्र 1, पृ.क्र. 48
6. पुर्वोक्त संदर्भ कत्र 2, पृ.क्र. 100
7. सोमवंशी ए.जी. राजकीय विश्लेशन आणि राजकीय तत्वज्ञान, बजाज पब्लिकेशन्स, अमरावती 1996,पृ.क्र.141
8. पुर्वोक्त संदर्भ कत्र 2, खंड 8 पृ.क्र. 64
9. पुर्वोक्त प्र.क्र., पृ.क्र.155
10. पुर्वोक्त प्र.क्र. 7, पृ.क्र. 142
11. भारताचे संविधान, ए.जी. मुखेडकर चौधरी लॉ पब्लिकेशन्स, जळगाव 2005.
12. पुर्वोक्त संदर्भ क्र. 3, पृ.क्र. 153
13. पुर्वोक्त संदर्भ क्र. 7, पृ.क्र. 144, 145, 146
14. पुर्वोक्त संदर्भ क्र.4
15. भोळ भा.ल. भारतीय गणराज्याचे शासन व राजकारण, पिंपळापुरे पब्लिकेशन्स, नागपुर 203, पृ.क्र. 213
16. भोसले, वसंत, अस्सा खासदार नको ग बाई दैनिक सकाळ, नागपुर, रविवार 15 मार्च 2009
17. दैनिक सकाळ, 9 डिसेंबर 2010, लोकसभेच्या अतिहासातील दुःखद पर्व, जयंती नटराजन.
18. दैनिक सम्राट, 4 जानेवारी 2011, डॉ. आंबेडकरांना अपेक्षित लोकशाही, दिलीपकुमार मोरे.
19. 2001 जनगणना अहवाल.
20. दैनिक सकाळ, नागपुर 20 सप्टेंबर 2009, संसदीय लोकशाहीतील असंसदीयपणा.